चंद्रपूर जिल्हा पोलीस वार्तापत्र

कार्यालय पोलीस अधीक्षक, चंद्रपूर



Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in

०४ सप्टेंबर, २०१९

☎ : 07172-264300

: 07172-255800

✍: 7447744100 (PRO)


# रामनगर पोलीसांची दारूतस्करांविरूध्द कार्यवाही

## ०१ आरोपीसह १२ लक्ष ३० हजाराचा मुद्द्‌माल जप्त

दिनांक ०४/०९/२०१९ रोजी रामनगर पोलीसांनी पोस्टे हद्दीत दोन वेगवेगळया ठिकाणी सापळा रचुन एकुण १२,३०,०००/—रू चा मुद्देमाल जप्त करून आरोपीस जेरबंद केले आहे.

रामनगर येथील पोलीस पथक पोस्टे परिसरात पेट्रोलींग करीत असतांना गोपनीय माहिती मिळाली की, बंगाली कॅम्प मार्गे सावरकर चौक कडे एका चारचाकी वाहनाने एक इसम अवैध रित्या दारू वाहतुक करणार आहे. अशा माहितीवरून रामनगर पोलीसांनी स्टेट बॅक ऑफ इंडिया जवळ सापळा रचुन बसले असता, मिळालेल्या माहितीप्रमाणे एक होंडा सिआरव्ही वाहन येतांना दिसले सदर वाहनास ताब्यात घेवुन विचारपुस करून वाहनाची झडती घेतली असता वाहनामध्ये ४४ बॉक्स देशी दारू किं. ४,४०,०००/—रू चा दारूचा माल मिळुन आला. सदरचा माल आणि दारू वाहतुकीकरीता वापरलेले होंडा सिआरव्ही चारचाकी वाहन किं. ७,००,०००/—रू असा एकुण ११,४०,०००/—रू चा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला असुन आरोपी नामे राहुल राजन्ना चिलमिल वय २० रा. लालपेठ कॉलरी चंद्रपुर यास अटक करण्यात आली आहे.

तसेच चंद्रपुर नागपुर रोडवरील लखमापुर येथील टोल नाक्याजवळ मिळालेल्या गोपनीय माहितीवरून सापळा रचुन एका टीव्हीएस एन्टॉर्क दुचाकीस ताब्यात घेवुन पाहणी केली असता ४ बॉक्स देशी दारू किं. ४०,०००/—रू आणि टीव्हीएस एन्टॉर्क किं. ५०,०००/—रू असा एकुण ९०,०००/—रू चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

सदरची कार्यवाही पोलीस अधीक्षक श्री. डॉ. महेश्वर रेड्डी यांचे मार्गदर्शनात रामनगर पोलीस स्टेशन प्रभारी पोनि. श्री. हाके यांचे नेतृत्वात, सपोनि. श्री. संतोष दरेकर, सफौ. प्रभुदास माहुलीकर, पोहवा. गजानन दोईफोडे, पोहवा. रजनिकांत, पोना. सुधिर पाटील, पोशि. रूपेश पराते, राकेश निमगडे, माजिद खान यांनी पार पाडली.

———————————————————————————————————————

Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in

☎ : 07172-264300
: 07172-255800
: 7447744100 (PRO)

# स्थानिक गुन्हे शाखेची दारू तस्कराविरूध्द कार्यवाही
# दोन आरोपीसह ११ लक्ष ५२ हजाराचा मुद्दे्माल हस्तगत

दिनांक ०३/०९/२०१९ रोजी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकास गोपनीय माहिती मिळाली की, दोन इसम घुग्घुस कडुन पडोली मार्गे बल्लारशाह कडे एका वोक्सवेगन वेंटो वाहनाने अवैध रित्या दारूची वाहतुक करणार आहे. अशा माहिती वरून स्थागुशा पथकाने होंडा शोरूम बंगाली कॅम्प रोडवर नाकेबंदी लावुन वाहनास ताब्यात घेवुन वाहनाची झडती घेतली असता वाहनामध्ये ५५ बॉक्स देशी दारू किं. ५,५०,०००/—रू, चा दारूचा माल मिळुन आला. सदरचा माल व दारू वाहतुकीकरीता वापरलेली वोक्सवेगन वेंटो क्र. एमएच ३४ एए ७१०० किं. ६,००,०००/—रू, आणि दोन मोबाईल फोन किं. २,०००/—रू असा एकुण ११,५२,०००/—रू चा मुद्दे्माल हस्तगत करण्यात आला आहे. सदरचा गुन्हा पोलीस स्टेशन रामनगर येथे नोंद करण्यात आला असुन आरोपी नामे १)यशवंत रामप्रसाद निषाद वय २३ रा. बामणी, बल्लारशाह, २) अंकीत श्रिनिवास कोंडावार वय २० विद्यानगर वार्ड बल्लारशाह यांना अटक करण्यात आली असुन पुढिल तपास सुरू आहे.

सदरची कार्यवाही पोलीस अधीक्षक श्री. डॉ. महेश्वर रेड्डी यांचे मार्गदर्शनात स्थागुशा प्रभारी पोनि. श्री. ओ.जी. कोकाटे, यांचे नेतृत्वात सफौ. विजय संगीडवार, पोहवा. राजेंद्र खनके, पोना. गजानन, पोना. अविनाश दशमवार, जमीर पठाण, अमजद खान, मिलींद चव्हाण, पोशि. संदिप मुळे, विनोद जावध यांनी पार पाडली.

————————————————————————————————————————